**चालः दोन दिसाचे जीवन तुझे है**
**तुमसंग मै तो नयन मिला के**

जन्मदीनी हरदेवजी वदले
करा म्हणे अर्पन
शेहनशहावाली मिशन
देणे जर का भेट हिच दया
(हि) शेहनशहावाली मिशन ||धृ ||

बोले जैसे, तैसे चालती
गुरूमताला धारण करती
एक दुसऱ्याची राखून मर्जी
मानीती सत्य वचन, शेहनशहावाली मिशन
जन्मदीनी हरदेवजी वदले ......||१||

शेहनशहाजींच्या, त्या समयाला
दिसे प्रेमाभक्ती, दृष्टी पथाला
गुरूज्ञानाने अध्यात्माने
शुद्ध होते अचरण, शेहनशहावाली मिशन
जन्मदीनी हरदेवजी वदले............||२||

प्रेम अपुलकी, करूणा समता
श्रद्धा होती, नव्हती विषमता
अवतारजींचा काळ अभ्यासा
असो तैसे वर्तन, शेहनशहावाली मिशन
जन्मदीनी हरदेवजी वदले.........||३||

"एकनाथा" भेदभाव नसावा
व्यवहारी सदभाव असावा
मानवतेच्या दिव्य गुणाने
सजवा आता जीवन, शेहनशहावाली मिशन
जन्मदीनी हरदेवजी वदले.......||४||